क्र.सकसं/शिक्षण/भासशि/राष्ट्रभाषा/
का-४/११.१२ / १०९४
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य पुणे.१
दिनांक१ ५/९/२०११

प्रति,
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी

विषय :- १) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक
२) इंदीरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ नवी दिल्ली
३) राष्ट्रभाषा प्रचार समिती ज्ञान मंडळ वर्धा
या संस्थेत दुरस्थ शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती मंजूरीबाबत.

संदर्भ :
१. शासन निर्णय क्र.ईबीसी-२००८/प्र.क्र.३०/मावक-२, दिनांक ५/१/२००५
२. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, वाशिम यांचे पत्र क्र.विजिसकअ/बा भासशि/जि-३/२६८/११-१२, दिनांक २३/६/२०११
३. विभागीय समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र.विकसअ/अम/भासशि/यचममुवि/३१००/११.१२, दि.५/८/२०११
४. संचालक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.एससीएस/१००/२०११, दिनांक १/८/२०११
५. सहसंचालक, राष्ट्रभाषा प्रचार समिती ज्ञान मंड्ळ वर्धा यांचे पत्र दि.१०/८/२०११
६. केंद्र शासनाकडील पत्र क्र.११०१७/०१/२००८-एससीडी-५, दि.३१/१२/२०१०.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, दुरस्थ शिक्षण घेणा-या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शासन निर्णय क्र.इबीसी-२००४/प्र.क्र.३०/मावक-२ दिनांक ५/१/२००५ सोबत केंद्र शासनाचे पत्र क्र.११०/७/७/२००२-एससीडी-५ दिनांक २८/१/२००४ अन्वये दिलेल्या नियमावलीतील परिशिष्ट-३ मधील नियम क्र.९ नुसार देय असल्याने ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये दोन लाखाचे आत आहे अशा दुरस्थ शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शिष्यवृत्ती देय आहे.

या संचालनालयाचे पत्र क्र.सकसं/शिक्षण/भासशि/मुक्त विद्यापीठ/शिष्यवृत्ती/०९/१०/का-४/१२८०, दिनांक ५/१२/२००९ नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत यापूर्वीच कळविले आहे.

E:\de\Complents\letter.lwp/80

सबब संबंधित विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी उपरोक्त विषयांकित संस्थेमध्ये शिक्षण घेणा-या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूरीबाबत कार्यवाही करावी.

१. संबंधित संस्था शासन मान्य व संस्थेमधील अभ्यासक्रमास शासनाची मान्यता असणे बंधनकारक राहील.

२. संबंधित संस्थेत अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याने मुळ टी.सी. द्वारेच प्रवेश घेणे आवश्यक आहे.

३. संस्थे.अंतर्गत सुरु असणा-या प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ३५ घड्याळी तासांचे नियोजन असावे. त्यानुसार; सहा महिन्यातील एका सत्रासाठी विद्यार्थ्यांस किमान ७-८ तासाचे अभ्यासकार्य पुर्ण करण्याचे बंधनकारक राहील.

४. विद्यापीठाचे नियमानुसार अभ्यासकार्य हे तासिका व प्रात्यक्षिक स्वरुपाचे असुन ते विद्यार्थ्यांनी अभ्यास केंद्रावरच जाऊन पूर्ण करणे बंधनकारक आहे.

५. संगणक विद्याशाखेच्या बी.एस.सी. (बी.सी.एस.) बी.सी.ए.,डी.ए.सी. इत्यादी शिक्षणक्रमातील प्रत्येक अभ्यासक्रम ४ श्रेयकांचा असून यातील एका अभ्यासक्रमासाठी किमान १४० घड्याळी तासांचे अभ्यासकार्य विद्यार्थ्यांकडून आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमासाठी ७५% उपस्थिती आवश्यक राहील.

उपरोक्त अटी व शर्तीचे पुर्ततेबाबत सबंधित प्राचार्यांची लेखी संमती प्रस्तावासोबत घेतल्याची खात्री करुनच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी पात्र असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूरीबाबत कार्यवाही करावी.

संचालक, समाज कल्याण ९/२/११
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञान गंगोत्री, गंगापूर धरणा जवळ, नाशिक
२. इंदीरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली
३. राष्ट्रभाषा प्रचार समिति ज्ञान मंडळ वर्धा जि. वर्धा
४. सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी

E:\dc\Complents\letter.hvp/81

ज़ाक्र. 22/6/2011